महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ , पूणे - ४११००५

Maharashtra State Board Of Secondary & Higher Secondary Education,
Pune Divisional Board , Pune - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / 25536712(OFF) | FAX- 020/25536761 E-mail sscboardpune@gmail.com |
|---|---|---|

क्रमांक/पुविमं/लेखा/ 7649

पुणे-४११००५

दि. १४/१२/२०२३

२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य

शाळा,कनिष्ठ महाविदयालय,

पुणे.

विषय : सन२०२३-२४शासनाने घोषित केलेल्या दुष्काळग्रस्त महसूल मंडळ,तालुक्यातील विदयार्थ्याचे परीक्षा शुल्क परताव्याबाबत ...

संदर्भ : १. शासन निर्णय क्र एससीबाय-२०२३/प्र क्र ३७/म७ दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र एससीबाय-२०२३/प्र क्र ३७म/७ दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र प्र.क्र.४७/एसडी-५-दि. २१/०८/२०१९
४. शासन निर्णय क्र प्र.क्र.४७/एसडी-५-दि. ०३/०२/२०२०
५. क्र.रा.म. सन/२०२३ दुष्काळ ख.ह./५२९६दि.०७/१२/२०२३ चे पत्र
६.क्र.रा.म. सन/२०२३ दुष्काळ ख.ह./५२९६दि.०७/१२/२०२३ चे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून प्राचार्य मुख्याध्यापक, सर्व शाळाा व क. महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयानुसार सन २०२३ मध्ये ४० तालुके व १०२१ महसूली मंडळमध्ये दुष्काळ घोषीत केला आहे.तसेच सदरील तालुके व महसुली मंडळामध्ये निर्धारीत सवलती लागू करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहते.

संदर्भ क्र.३ व ४ अनुसार सदरील तालुके व महसुली मंडळातील परीक्षा र्थ्यांचे परीक्षा शुल्क रकमेची प्रतिपुर्ती विदयार्थ्यांच्या पालकांच्या आधार संलग्न बॅक खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करावयाची आहे.

मंडळने परीक्षा आवेदन पत्रामध्ये (online application) माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षर्थीसाठी अ.क्र.२० आणी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षार्थीसाठी अ.क्र.२२ मध्ये महसुल विभागासह bank account इत्यादी सविस्तर माहिती नमूद करण्यासाठी रकाने उपलब्ध केले आहेत. सदर रक्कान्यामध्ये विद्यार्थी /पालकांचे आधार संलग्न bank account ची माहितीसह महसूल विभाग /गाव इत्यादी माहिती भरणे संबंधित विद्यार्थी /पालक/मुख्याध्यापक/माध्यामिक शाळा ा/महाविद्यालये आवश्यक /बंधनकारक आहे.यां अनुषंगाने राज्यमंडळाने संदर्भ क्र ५ व ६ अन्वये सूचना निर्गमित केले आहेत.

सोबत सदरचे राज्य मंडळ पत्र देण्यात येत आहे.त्यानुसार कार्यवाही करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.

( औदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे -४११००५

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

ईमेलव्दारे

क्र.रा.मं./सन २०२३ दुष्काळ ख.हं./ 5296
पुणे ४११ ००४.
दिनांक - १३/११/२०२३
07-12-23

प्रति,
विभागीय सचिव
पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ
पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी.

विषय – सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यांव्यतिरीक्त इतर तालुक्यांमधील १०२१ महसूल विभागामध्ये दुष्काळ घोषित – परिक्षा शुल्क परतावा.

संदर्भ – १. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३.
२. क्र.रा.मं./सन २०२३ दुष्काळ ख.हं./५०५३, दि.१७/११/२०२३.
३. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय क्र.१ शासन निर्णय दि.३१/१०/२०२३ अनुसार, सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये महाराष्ट्र राज्यातील पुढे नमूद केलेल्या १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित झाला आहे. संदर्भीय क्र.३ च्या शासननिर्णयानुसार पूर्वी जाहीर केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यातील १०२१ महसुल मंडळामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला असून, दुष्काळ जाहीर केलेल्या कार्यक्षेत्रातील, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा फेब्रुवारी / मार्च २०२४ साठी प्रविष्ठ होणा-या / झालेल्या परिक्षार्थींना, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१/८/२०१९ आणि शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.३/२/२०२० अनुसार, "परिक्षा फीच्या रकमेची प्रतिपूर्ती विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न बक खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करावयाची आहे. मंडळाने परीक्षा आवेदनपत्रामध्ये (online application) माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षार्थींसाठी अ.क्र.२० आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षार्थींसाठी अ.क्र.२२ मध्ये महसुल विभागासह, Bank account इ. सविस्तर माहिती नमूद करणेसाठी रकाने उपलब्ध केले आहे. सदर रकान्यांमधे विद्यार्थी / पालकांचे आधार संलग्न Bank account ची माहितीसह महसूल विभाग/गाव इ. माहिती भरणे आवश्यक / बंधनकारक आहे.

परीक्षा आवेदनपत्रामधील सदर माहिती संबंधित विद्यार्थी / पालक / मुख्याध्यापक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / महाविद्यालये यांनी भरणे आवश्यक / बंधनकारक आहे. सबब, याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित शाळा/महाविद्यालये यांना तातडीने, परिक्षार्थी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रामधील सदर माहिती नमूद करणेबाबत कळवावे.

(माणिक बांगर)
सचिव(प्र.)
राज्यमंडळ,पुणे.

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर -

१. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे ४११ ००१.
२. मा.शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१-
   यांना विनंती करण्यात येत आहे की, पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे परीक्षा आवेदन पत्रामधील सर्व माहितीची तातडीने पूर्तता करणेबाबत आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांना सूचित करण्यात यावे.
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, महाराष्ट्र राज्य, सर्व जिल्हे - यांना या पत्राद्वारे कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना पत्रामध्ये नमूद केलेली सर्व माहितीची पूर्तता करणेबाबत कळवावे.